# न्यूज एक्सप्रेस मराठी

मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!

: ९८३४१३८४८२




# 'छावा' चित्रपट महाराष्ट्रभरात करमुक्त व्हावा!

## भाजपाचे आमदार महेश लांडगे यांची मागणी : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठवले निवेदन

**पिंपरी | प्रतिनिधी**

हिंदवी स्वराज्याचे दुसरे छत्रपती धर्मवीर संभाजी महाराज यांची शौर्यगाथा उलगडणारा आणि जीवनचरित्रावर आधारित "छावा " चित्रपट दि. 14 फेब्रुवारी रोजी देशभरात प्रदर्शित झाला आहे. या चित्रपटाला पहिल्याच दिवसापासून शिवभक्त आणि सिनेचाहत्यांचा उदंड प्रतिसाद मिळत असून सिनेमागृहात चाहत्यांची तुफान गर्दी पाहायला मिळत आहे.

हिंदूत्वासाठी बलिदान देणाऱ्या संभाजी राजांचा इतिहास मोठ्या पडद्यावर अधिकाधिक नागरिकांना पहायला मिळावा. त्याद्वारे शिव-शंभू विचारांचा जागर व्हावा यासाठी महाराष्ट्रभरात "छावा" चित्रपट करमुक्त करावा, अशी मागणी भाजपा नेते तथा हिंदुत्ववादी आमदार महेश लांडगे यांनी केली आहे.



याबाबत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन पाठवले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, हिंदवी स्वराज्यासाठी बलिदान देणारे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचा जाज्वल्य इतिहास नव्या पिढीसमोर मांडण्याचा प्रयत्न छावा या चित्रपटाच्या माध्यमातून दिग्दर्शक लक्ष्मण उत्तेकर यांनी केला आहे. अभिनेते विकी कौशल यांनीही हिंदुभूषण धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांची भूमिका अत्यंत प्रभावीपणे साकारली आहे. त्यामुळे हा चित्रपट शिव-शंभू प्रेमींच्या पसंतीस उतरत आहे.

संभाजीराजांनी आपल्या कारकिर्दीमध्ये 125 यशस्वी लढाया लढल्या आहेत. या काळात ते एक कुटुंबप्रमुख म्हणून, पती म्हणून, पिता म्हणून, मुलगा म्हणून, राजा म्हणून कसे होते? याचे "छावा" चित्रपटाद्वारे खूप सुंदरपणे सादरीकरण केले आहे. महाराजांचे चरित्र हे खूप प्रेरणादायी आहे. त्यामुळेच, महाराष्ट्रात हा चित्रपट टॅक्स मुक्त करावा, अशी मागणीही आमदार लांडगे यांनी केली आहे.

> “ धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचा जगातील सर्वात उंच पुतळा पिंपरी-चिंचवडमध्ये मोशी या ठिकाणी उभारण्याची संकल्पना आम्ही प्रत्यक्षात आणत आहोत. "स्टॅच्यू ऑफ हिंदूभूषण"चे काम प्रगतीपथावर आहे. दिग्दर्शक लक्ष्मण उतेकर यांनी महाराजांचा इतिहास रुपेरी पडद्यावर भव्य-दिव्यपणे मांडला आहे. तो अधिकाधिक नागरिकांना पहायला मिळावा. त्याद्वारे शिव-शंभू विचारांचा जागर व्हावा. यासाठी "छावा" चित्रपट करमुक्त झाला पाहिजे. यासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे मागणी केली आहे. आमचे हिंदूत्ववादी सरकार यासाठी सकारात्मक निर्णय घेईल, असा विश्वास वाटतो.
>
> **- महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा.**

# शहराचे सौंदर्य वाढवण्यासाठी विद्युत ठेकेदार महत्त्वाचा घटक; आमदार जगताप

## इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टर असोसिएशन ऑफ महाराष्ट्र संस्थेच्या पिंपरी चिंचवड विभागीय शाखेची स्थापना

**पिंपरी | प्रतिनिधी**

भारतातील प्रत्येक घरात वीज पुरवठा देणे हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे ध्येय आहे. मेक इन इंडिया प्रकल्पाअंतर्गत सोलर सारखा अपारंपरिक ऊर्जेचा वापर वाढवून, ऊर्जा क्षेत्रात स्वयंपूर्ण होण्यासाठी विद्युत ठेकेदारांना खूप काम करावे लागणार आहे. विद्युत ठेकेदारांनी आता आधुनिकतेचा स्विकार केला पाहिजे. वेगाने वाढत असलेल्या पिंपरी चिंचवड शहरात मेट्रो, रस्ते, अनेक व्यावसायिक, निवासी बांधकाम प्रकल्प विकसित करण्यासाठी, शहराचे सौंदर्य वाढवण्यासाठी विद्युत ठेकेदार महत्त्वाचा घटक असणार आहे.



विद्युत ठेकेदारांची इकॅम सारखी संस्था शहरात होणे आवश्यक होते असे प्रतिपादन आमदार शंकर जगताप यांनी केले.

राज्यातील विद्युत ठेकेदारांच्या इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टर असोसिएशन ऑफ महाराष्ट्र (इकॅम) या संस्थेच्या शताब्दी वर्षानिमित्त आणि पिंपरी चिंचवड विभागीय शाखा स्थापनेच्या उद्घाटन प्रसंगी आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात आ. जगताप बोलत होते.

यावेळी इकॅम महाराष्ट्र अध्यक्ष उमेश रेखे, सचिव देवांग ठाकूर, इकॅम पिंपरी चिंचवड अध्यक्ष सयाजी पाटील, पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष बाळासाहेब कदम जळगाव अध्यक्ष बाबुभाई मेंहदी, महाराष्ट्र माजी अध्यक्ष वामन भुरे, अहिल्यानगर अध्यक्ष दत्ता झिंजुर्डे, धुळे - नंदुरबार अध्यक्ष प्रवीण बडगुजर, पिंपरी चिंचवड सचिव रमेश भालेराव, खजिनदार संजय कुमार, सहसचिव गजानन पेटसांगवे, मुख्य कार्यालय संचालक मंगेश लोडम, आदींसह पिंपरी चिंचवड शहरातील सभासद तसेच राज्यभरातून आलेले प्रतिनिधी उपस्थित होते.

स्वागत, प्रास्ताविक करताना पिंपरी चिंचवड अध्यक्ष सयाजी पाटील यांनी सांगितले की, इकॅमच्या शताब्दी वर्षामध्ये पिंपरी चिंचवड विभागीय शाखेला मान्यता मिळणे हे गौरवास्पद आहे. यासाठी मागील पंधरा वर्षापासून पाठपुरावा करण्यात येत होता. महाराष्ट्र असोसिएशनने पिंपरी चिंचवडच्या सभासदांवर दाखवलेला हा विश्वास निश्चितच सार्थ ठरवू. आमदार शंकर जगताप यांनी निवडून आल्यानंतर पहिल्याच विधानसभा अधिवेशनात महावितरणच्या विषयावर चर्चा घडवून आणली, असेच पुढील काळात देखील मिळावे अशी अपेक्षा सभासदांच्या वतीने पाटील यांनी व्यक्त केली.

# 'पीएमआरडीए'चे चांगले पाऊल

## पुणे महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) कामकाजाचे विकेंद्रीकरण करण्याचा निर्णय

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) कामकाजाचे विकेंद्रीकरण करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी चार प्रादेशिक कार्यालय आणि हद्दीतील प्रत्येक तालुक्यांमध्ये एक कार्यालय काढण्यात येणार आहे. त्यामुळे नागरिकांना कामकाजासाठी प्राधिकरणाचे मुख्य कार्यालय गाठण्याची आवश्यकता राहणार नाही. 'पीएमआरडीए'च्या पुढील आर्थिक वर्षाच्या (२०२५-२६) अर्थसंकल्पास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत मान्यता देण्यात आली. या बैठकीत 'पीएमआरडीए'च्या कामकाजाचे विक्रेदीकरण करण्याबाबतचा प्रस्ताव प्रशासनाकडून सादर करण्यात आला होता. त्या प्रस्तावास या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे.




'पीएमआरडीए'ची ६ हजार २४६ चौरस किलोमीटर एवढे क्षेत्र आहे. त्यामध्ये नऊ तालुक्यातील ६९७ गावांचा समावेश आहेत. त्यामुळे या गावांतील नागरिकांना कामासाठी पुणे शहरात यावे लागते. त्यासाठी लागणारा वेळ आणि होणारा खर्च विचारात घेतला तर नागरिकांना ते त्रासदायक ठरते. नागरीकांना सर्व सुविधा, तालुक्याच्या ठिकाणी मिळणे सोईचे व्हावे, यासाठी प्राधिकरणाने हा निर्णय घेतला आहे. प्रत्येक वेळी प्राधिकरणाच्या कार्यालयात हेलपाटे मारावे लागून नये, हा त्यामागे उद्देश असल्याचे प्राधिकरणाकडून सांगण्यात आले. त्यानुसार प्राधिकरणाच्या पूर्व, पश्चिम, उत्तर आणि दक्षिण अशा चारही दिशांना प्रादेशिक कार्यालय आणि प्रत्येक तालुक्यात उपकार्यालय काढण्यात येणार आहे. या कार्यालयांच्या माध्यमातून नागरिकांना सेवा पुरविण्याचे उद्दिष्ट प्राधिकरणाकडून ठेवण्यात आले आहे. सध्या प्राधिकरणाचे पिंपरी-चिंचवड येथी आकुर्डी आणि पुण्यात औंध अशी दोन कार्यालय आहे.

### अशा सुविधा मिळणार

- बांधकाम परवानगी अर्ज स्वीकारण्याची सुविधा
- झोन दाखले
- अनधिकृत बांधकामांवर लक्ष ठेवणे.
- भूसंपादनाची प्रकरणे मार्गी लागणे.
- अग्निशमन यंत्रणा उभी करणे
- घरकुल योजनेचे अर्ज स्वीकारणे.
- तक्रार अर्जाचे दाखल करून घेणे.
- विकास आराखड्याची अंमलबजावणी

> तीस ते चाळीस किलोमीटरचा प्रवास करून मुख्य कार्यालयात येण्याऐवजी नागरिकांची कामे तालुक्याच्या ठिकाणी मार्गी लागावीत, या उद्देशाने प्राधिकरणाने हा निर्णय घेतला आहे. तालुक्याच्या ठिकाणच्या कार्यालयातच तक्रारींचे निवारण व्हावे, बांधकाम परवानगीसाठी अर्ज करता यावा, यासारखे नागरिकांशी संबंधित सर्व खात्याचे अधिकारी तेथे असतील.
>
> **- डॉ. योगेश म्हसे, आयुक्त, पीएमआरडीए**

# पिंपरी चिंचवड विद्यापीठाचा 'अनंतम 2025' सांस्कृतिक सोहळा संपन्न

## भारताला शिक्षण, कला, क्रीडा, संस्कृतीचा मोठा वारसा : हर्षवर्धन पाटील

**पिंपरी | प्रतिनिधी**

भारताला शिक्षण, कला, क्रीडा, संस्कृतीचा मोठा वारसा आहे. या समृद्ध सांस्कृतिक वारशाशी विद्यार्थी जोडले जावेत यासाठी अनंतम सारखे सांस्कृतिक सोहळे झाले पाहिजेत असे प्रतिपादन पिंपरी चिंचवड विद्यापीठाचे कुलपती हर्षवर्धन पाटील यांनी केले.



पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या साते वडगाव मावळ येथील पिंपरी चिंचवड विद्यापीठ (पीसीयू) येथे 'अनंतम २०२५' हा वार्षिक सांस्कृतिक सोहळा प्रमुख सेलिब्रिटींच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

दोन दिवस चाललेल्या या वार्षिक सोहळ्यामध्ये कला, संस्कृती आणि राष्ट्रीय ऐक्याचा भव्य उत्सव अनुभवायला मिळाला. या सोहळ्याच्या आयोजनात ७५० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. तर ३,००० पेक्षा जास्त प्रेक्षकांनी उपस्थिती राहून सहभागी कलाकारांचा उत्साह वाढविला. पहिल्या दिवशी 'सैराट' चित्रपटातील मुख्य कलाकार आकाश ठोसर याने विद्यार्थ्यांसोबत संवाद साधत कार्यक्रमाची रंगत वाढवली. सांस्कृतिक कार्यक्रम हे विद्यार्थी व्यक्तिमत्त्वविकास, आत्मविश्वास आणि सामाजिक कौशल्ये जोपासण्याचे महत्त्वाचे माध्यम असल्याचे आकाश ठोसर याने सांगितले. दुसऱ्या दिवशीची रंगत 'नटरंग' मधील अभिनय व 'अप्सरा आली' या गाण्यासाठी प्रसिद्ध अभिनेत्री सोनाली कुलकर्णीच्या उपस्थितीमुळे विद्यार्थ्यांचा उत्साह शिगेला पोहोचला. सोनालीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्य आणि पराक्रमाला वंदन करणारे 'शिव गर्जना' सादर करून उपस्थितांना भारावून टाकले. विद्यार्थ्यांसोबत नाच, गाणी आणि मुक्त संवाद साधत या दोन्ही कलाकारांनी उत्सवाला खराखुरा सोहळ्याचा बाज दिला.

पीसीयूने अवघ्या दोन वर्षांत ३,००० हून अधिक विद्यार्थ्यांचे शिक्षण देऊन शिक्षण क्षेत्रात आंतरराष्ट्रीय पातळीवर भरारी घेतली आहे. विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक प्रगतीबरोबरच समाज आणि राष्ट्राच्या विकासातही मोठे योगदान आहे असे पीसीयूच्या कुलगुरू डॉ. मणिमाला पुरी यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांनी विविध राज्यांतील लोकनृत्ये व संगीताचे सादरीकरण करून भारताच्या संस्कृतीची विविधता सादर केली हे आपल्या देशाच्या बहुरंगी संस्कृतीचे प्रतिबिंब आहे. दोन वर्षात पीसीयूला मिळालेली अनेक मानांकने व पुरस्कार अभिमानास्पद आहे असे प्र-कुलगुरू डॉ. सुदीप थेपडे यांनी सांगितले. अशा जल्लोषपूर्ण वातावरणातून एकोप्याची भावना वृद्धिंगत होते, ज्यामुळे सर्वांनाच दीर्घकालीन यशासाठी प्रेरणा मिळते असे अभिनेत्री सोनारी कुलकर्णी हिने सांगितले.

पिंपरी चिंचवड विद्यापीठ कुलपती हर्षवर्धन पाटील, पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट (पीसीईटी) अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्मताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर खजिनदार शांताराम गराडे, व्यवस्थापन प्रतिनिधी अजिंक्य काळभोर, नरेंद्र लांडगे यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

# बेकायदेशीर क्रशरने नागरिकांचे आरोग्य धोक्यात

## क्रशरकडून गौण खनिजांचे प्रचंड उत्खनन सुरू आहे, हवा आणि ध्वनिप्रदूषण मोठ्या प्रमाणात होत आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

चऱ्होली येथील चोविसावाडी परिसरात दहा ते पंधरा बेकायदेशीर क्रशर प्लांट सुरू आहेत. हे क्रशर रात्रंदिवस सुरू असतात. या क्रशरकडून गौण खनिजांचे प्रचंड उत्खनन सुरू आहे. या क्रशरने हवा आणि ध्वनिप्रदूषण मोठ्या प्रमाणात होत आहे. यामुळे सर्व वयोगटातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

गेल्या सात-आठ वर्षात चोविसावाडी परिसरात मोठ्या प्रमाणात गृहनिर्माण प्रकल्प झाले. यामुळे हजारो नागरिक या ठिकाणी वास्तव्यास आल्याने नागरिकांची प्रचंड वर्दळ वाढली आहे. या क्रशरमुळे हवा आणि ध्वनिप्रदूषण वाढू लागल्याने त्यांचा त्रास सोसायटीतील नागरिकांना होत आहे. नागरिकांच्या घरात, वाहनांसह हवेत धूळ पसरत आहे. क्रशरमुळे हवेत धूळ मिसळून हवेची गुणवत्ता ढासळून ३०० पेक्षा अधिक हवेचा निर्देशांक गेला आहे. हे प्रमाण धोकादायक पातळीपेक्षा जास्त मानले जाते.

चोविसावाडी येथील सर्वे क्रमांक ८७, ८८, ८९ यासह परिसरातील हे सर्व क्रशर बंद करा, अशी मागणी प्रणाम टॉवर, कोरल पार्क, सफायर टॉवर, ग्रीन व्हिलेसह अन्य सोसायटीतील शेकडो नागरिकांनी केली आहे. याबाबत पुणे जिल्हाधिकारी, पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त, पिंपरी-चिंचवड अप्पर तहसीलदार, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे उपप्रादेशिक अधिकारी यांच्याकडे तक्रार दिली आहे.



### हवेच्या निर्देशांकाने ओलांडला 300चा टप्पा

» बेकायदेशीर क्रशरमधून निघणा-या धुळीमुळे हवेची गुणवत्ता ढासळली आहे. या भागातील हवा खराब श्रेणीत पोहोचलेली आहे. खराब हवेचा नागरिकांच्या आरोग्यावर परिणामकारक ठरत आहे. त्यातून श्वसनविकाराचा धोकादेखील वाढत आहे. हवेचा दर्जा निर्देशांक (एक्यूआय) आदर्शपणे १०० च्या खाली असणे आवश्यक आहे. तथापि, आमच्या परिसरात एक्यूआय पातळी खराब श्रेणीत गेली आहे. परिणामी दमा आणि हृदयाची समस्या असलेल्या व्यक्तींच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे. हवेची गुणवत्ता अत्यंत 'खराब' दर्जापर्यंत घसरली आहे, असे सोसायटीतील नागरिकांकडून सांगण्यात येत आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीत असलेल्या चऱ्होली येथील चोविसावाडी परिसरात आवश्यक परवानगी न घेता क्रशर प्लांट सुरू आहेत. हे क्रशर प्लांट सोसायटीपासून अगदी ५०० ते ७०० फूट अंतरावर आहेत. या क्रशरचालकांनी कित्येक वर्षापासून बेकायदेशीर खाणीमधून गौण खनिज उत्खनन केले जात आहे. क्रशरचालकांकडून पर्यावरण नियमांचे पालन न करता सर्रासपणे उल्लंघन सुरू आहे. दिवस-रात्र क्रशर सुरू राहिल्याने मातीचा धुरळा हवेत उडत असतो. यामुळे त्या भागात हवा आणि ध्वनिप्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढले आहे.

### अनधिकृत क्रशर प्लांट अनेक वर्षांपासून सुरु

» चऱ्होलीतील चोविसावाडीत गृहप्रकल्पांची संख्या वाढली आहे. त्या प्रकल्पांसाठी वाळू, खडी हे मटेरियल प्लांटमधून मिळत आहे. सर्वच क्रशर प्लांट हे दिवसरात्र सुरू असतात. यामुळे परिसरात वाहनांची वर्दळ आणि प्लाँटमधील मशिनचा कर्कश आवाज कायम सुरू असतो. परिणामी चोविसावाडी भागातील सोसायटीतील नागरिकांना अशुद्ध हवा, ध्वनिप्रदूषणामुळे रात्रभर झोपच लागत नाही. त्यामुळे सदरील क्रशर प्लांटवर तत्काळ कारवाई करून हे प्लांट बंद करा, अशी मागणी सोसायटीतील नागरिकांतून जोर धरू लागली आहे.

> चोविसावाडीत १५ ते २० क्रशर सुरू आहेत. हे क्रशर बंद करावे, अशी येथील सोसायटी रहिवाशांची मागणी आहे. त्यानुसार सर्व क्रशरची तपासणी करून बेकायदेशीर असलेल्या क्रशरवर तत्काळ कारवाई करत ते बंद केले जातील.
>
> **- जयराज देशमुख, अप्पर तहसीलदार, पिंपरी-चिंचवड**

> क्रशर सुरू करण्यासाठी पुणे जिल्हाधिकारी कार्यालयाकडून परवानगी दिली असते. मात्र, हवा आणि ध्वनिप्रदूषण करणाऱ्या चोविसावाडीतील क्रशरने आवश्यक परवानगी घेतल्या का, याबाबत तपासणी केली जाईल. हवा आणि वायुप्रदूषण करणाऱ्या क्रशरवर दंडात्मक कारवाई करण्यात येईल. तसेच हे क्रशर कायमस्वरूपी बंद करण्यासाठी पुणे जिल्हाधिकारी आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला पत्र पाठविण्यात येईल.
>
> **- संजय कुलकर्णी, मुख्य अभियंता, पर्यावरण विभाग, पिंपरी-चिंचवड**

# पिंपरी-चिंचवड एमआयडीसीतील कचऱ्याचा प्रश्न 'घातक'

## पर्याय शोधण्याऐवजी महापालिका आणि एमआयडीसी एकमेकांकडे बोट दाखवत असल्याने औद्योगिक क्षेत्रातील कचऱ्याचा प्रश्न दिवसेंदिवस 'घातक' बनत चालला आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

एमआयडीसी परिसरात कार्यरत कंपन्यांमध्ये निर्माण होणारा घातक कचरा उचलून त्यावर विघटन प्रक्रिया करण्यासाठी शहरात स्वतंत्र जागा आणि कचरा विघटन केंद्रच नाही. त्यामुळे रांजणगाव येथे कचरा नेण्यासाठी उद्योजकांना खासगी एजन्सीसमोर लोटांगण घालावे लागत आहे. त्यावर पर्याय शोधण्याऐवजी महापालिका आणि एमआयडीसी एकमेकांकडे बोट दाखवत असल्याने औद्योगिक क्षेत्रातील कचऱ्याचा प्रश्न दिवसेंदिवस 'घातक' बनत चालला आहे.

पिंपरी-चिंचवड शहरामध्ये भोसरी, पिंपरी आणि चिंचवड एमआयडीसीमध्ये हजारो छोट्या मोठ्या कंपन्या आहेत. त्यातील असंख्य कंपन्यांमध्ये दररोज मोठ्या प्रमाणात घातक कचरा निर्माण होतो. त्याचे विघटन करण्यासाठी शहरात स्वतंत्र केंद्र नसल्यामुळे उद्योजकांना हा कचरा घेऊन रांजणगाव येथे जावे लागते. घातक कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी महापालिका आणि एमआयडीसी यांच्यात समन्वयाचा अभाव असल्याने विघटन केंद्राच्या प्रश्नावर तोडगा काढण्यात अपयश येत आहे.



महापालिका आरोग्य विभागाकडून कंपन्यांमधील ओला आणि सुका कचरा मोशी कचरा डेपो येथे वाहून नेला जातो. महापालिकेच्या आरोग्य विभागाकडे पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध नसल्यामुळे मोजके कर्मचारी आणि घंटागाडी यंत्रणेद्वारा येथील घनकचऱ्याचे व्यवस्थापन केले जाते. तरी, रात्री-अपरात्री कंपन्यांच्या बाहेर रस्त्यावर कचरा पडलेला असतो. महापालिकेकडून तो वेळेवर उचलला जात नाही. त्यामुळे परिसरात रोगराई पसरुन कामगारांच्या आरोग्याला धोका निर्माण झाल्याच्या तक्रारी उद्योजकांनी केल्या आहेत.

### विदेशात भेटी, पण कृती शून्य...

» घातक कचरा विघटन यंत्रणा विकसित करण्याकरिता उद्योजकांनी महापालिका अधिकाऱ्यांसमवेत बैठका घेतल्या. पिंपरी-चिंचवड शहराचा प्रदूषण निर्देशांक नियंत्रणात आणण्यासाठी महापालिकेचे अधिकारी परदेशात तसेच इतर राज्यांच्या महापालिकांना भेटी देऊन आले. तरी देखील घातक कचरा विघटन केंद्र विकसित करण्याबाबत महापालिका सकारात्मक भूमिका घेत नसल्याची खंत उद्योजकांनी व्यक्त केली आहे.

### घातक कचरा म्हणजे काय ?

» प्रत्येक कंपनीमध्ये एकूण कचऱ्याच्या १० ते १५ टक्के घातक कचरा निर्माण होतो. त्यामध्ये काच, बॅटरी, सेल्स, रबर, रंगाचे डब्बे, रासायनिक पावडर, ऑइल, हॅण्डग्लोज, फिनेल, ग्रीसचे डब्बे, तुटलेले बल्ब व ट्युबलाईट, कीटकनाशके, जंतुनाशके अशा स्वरूपाचा कचरा असतो. हा कचरा कोणत्याही सजीवाला घातक ठरु शकतो. घातक कचऱ्यावर प्रक्रिया करुन त्याचे विघटन करण्याचे दर अवाजवी असल्यामुळे ते कंपन्यांना परवडत नसल्याची खंत काही उद्योजकांनी व्यक्त केली.

# उत्तम आरोग्यासाठी लोणी मॅरेथॉन स्पर्धेत धावले साडे तीन हजार स्पर्धक

## पुनीत बालन ग्रुप , फ्री रनर्स ग्रुप व माजी विद्यार्थी विकास प्रबोधिनीच्या वतीने आयोजन

**पुणे | प्रतिनिधी**

लोणी (ता.आंबेगाव) या ठिकाणी पुनीत बालन ग्रुप , फ्री रनर्स ग्रुप ,माजी विद्यार्थी विकास प्रबोधिनी लोणी यांच्या संयुक्त विद्यमाने मॅरेथॉन स्पर्धा पार पडली. स्पर्धेचे हे तिसरे वर्ष होते. ३ किमी,५ किमी, १० किमी आणि २१ किमी, अशा चार प्रकारात ही स्पर्धा पार पडली. पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात पार पडलेली ही भव्य दिव्य स्पर्धा जिल्ह्यात पहिली असून स्पर्धेसाठी साडेतीन हजार स्पर्धकांनी आपला सहभाग नोंदवला. विशेष म्हणजे इथिओपिया या देशातील दोन स्पर्धक स्पर्धे करता सहभागी झाले होते. राजस्थान, हरियाणा,उत्तर प्रदेश या राज्यातील देखील स्पर्धक या स्पर्धेत सहभागी झाले होते.

२१ किलोमीटर मॅरेथॉन स्पर्धेची सुरुवात सकाळी ५ वाजून ५५ मिनिटांनी करण्यात आली. त्यानंतर क्रमाक्रमाने इतर स्पर्धेतील स्पर्धकांना सोडण्यात आले. लहान मुलांपासून ९० वर्षाच्या वयो वृद्धापर्यंतच्या सर्व गटातील लोकांनी आकर्षक वेशभूषा करूनही सहभाग नोंदवला. बक्षीस वितरणासाठी आंबेगाव तालुक्याचे आमदार आणि महाराष्ट्र विधिमंडळातील ज्येष्ठ सदस्य माजी मंत्री दिलीपराव वळसे पाटील उपस्थित होते.

त्यांच्यासमवेत गुजरात भाजपचे ज्येष्ठ नेते अतुल ब्रह्मभट आणि पुणे जिल्हा भाजपचे ज्येष्ठ नेते ताराचंद कराळे हे देखील उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते स्पर्धेतील सर्व विजेत्यांना रोख बक्षीस देण्यात आले. या कार्यक्रमासाठी निरंकार आर्ट्स पुणे, जनकल्याण पतसंस्था लोणी आणि आदित्य कन्स्ट्रक्शन पुणे यांच्यासह काही मान्यवरांनी अर्थसाह्य केले. स्पर्धेचे मुख्य स्पर्धा संयोजक राजेश वाळुंज यांनी नियोजनाची धुरा सांभाळली. यावेळी प्रबोधिनीचे अध्यक्ष उदयसिंह वाळुंज,खजिनदार बाळासाहेब गायकवाड तसेच मंत्रालयातील सहसचिव कैलास गायकवाड, सरपंच सावळाभाऊ नाईक, राष्ट्रपती पदक विजेते पोलीस अधिकारी किसन गायकवाड, मयूर लोखंडे, नवनीत सिनलकर, पांडुरंग वाळुंज, संतोष पडवळ, अविनाश वाळुंज, प्रकाश वाळुंज हे प्रबोधिनीचे सदस्य उपस्थित होते. राष्ट्रप्रेमी युवक मंडळ लोणी तसेच लोणी गावातील विविध युवक मंडळांनी पूर्ण सहकार्य केले. अरुण साकोरे आणि पडवळ अकॅडमी यांनी देखील मोलाचे सहकार्य केले. या स्पर्धेसाठी विविध तालुक्यातील जवळपास 50 शाळांमधील विद्यार्थ्यांनी सहभागी नोंदवला. धामणी प्राथमिक आरोग्य केंद्राचे डॉ. बिरारी, लोणी गावातील डॉ. चंद्रकांत देशमुख, डॉ. रसिक काळे, डॉ.भास्कर भोसले, डॉ. संजय सिनलकर यांनी वैद्यकीय विभागाची जबाबदारी सांभाळली.

यावेळी बोलताना माजी मंत्री दिलीप वळसे पाटील म्हणाले," ही मॅरेथॉन स्पर्धा लोणी गावाच्या लौकिकात आणि वैभवात भर घालणारी असून या स्पर्धेला आंतरराष्ट्रीय दर्जा प्राप्त करून देण्यासाठी आम्ही प्रयत्नशील राहू. यावेळी लोणी गावचे सरपंच सावळेराम नाईक,शरद सहकारी बँकेचे संचालक अशोक आदक पाटील, पुनीत बालन ग्रुपचे सदस्य चेतन लोखंडे,जनकल्याण पतसंस्थेचे अध्यक्ष ज्ञानेश्वर वाळुंज पाटील, उपसरपंच स्वाती वाळुंज, माजी सरपंच उद्धव लंके,दिलीप वाळुंज, माजी उपसरपंच प्रकाश गायकवाड आणि सर्व ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते. डॉ. अविनाश वाळुंज आणि ऋतुजा इंगळे यांनी सूत्रसंचालन केले.




### सहभागी स्पर्धकाला टी-शर्ट, मेडल आणि प्रशस्तीपत्र

» अनेक जिल्ह्यांमधून स्पर्धेत स्पर्धक सहभागी झाले होते. पुनीत बालन ग्रुप पुणे, फ्री रनर्स पुणे आणि माजी विद्यार्थी विकास प्रबोधिनी,लोणी हे या स्पर्धेचे प्रायोजक होते. प्रत्येक सहभागी स्पर्धकाला टी-शर्ट, मेडल आणि प्रशस्तीपत्र देण्यात आले. बाहेरून येणाऱ्या स्पर्धकांसाठी राहण्याची व्यवस्था शाळेमध्ये माजी विद्यार्थी विकास प्रबोधिनीने केली होती. माणिकचंद ऑक्झरीच यांच्या वतीने सर्व स्पर्धकांना मोफत पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती.

### अभिनेते हार्दिक जोशी आवर्जून उपस्थित

» स्पर्धकांचा तणाव हलका करण्यासाठी झुंबा नृत्याच्या माध्यमातून व्यायाम प्रकार करून घेण्यात आले. यावेळी स्पर्धकांना प्रोत्साहन देण्यासाठी मराठी मालिका अभिनेते हार्दिक जोशी हे देखील आवर्जून उपस्थित होते. याप्रसंगी त्यांच्या गाजलेल्या तुझ्यात जीव रंगला या मालिकेतील संवादही त्यांनी प्रेक्षकांना म्हणून दाखवला.

# मीटर फास्ट, महावितरणचे अधिकारी स्लो; सोलर सिस्टिम धारकाला वीज बिलांचा दणका

## महावितरणचे अधिकारी यांच्याकडून सुरू असलेल्या वेळ काढूपणामुळे वीज ग्राहकाला वीज बिलांचा दणका बसू लागला असून आर्थिक त्रासाला सामोरे जाण्याची वेळ आली आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

वाघोली तालुका हवेली येथील घरगुती वापरासाठी सहा केव्ही ची गरज असताना दहा केव्ही थ्री फेज कनेक्शन घेऊन सोलर सिस्टिम बसवण्यात आलेल्या वीज ग्राहकाला सहा वर्षे त्रास न आलेले वीज भाडे आता येत असल्याने मीटर फास्ट बाबत पडताळणी करण्याची विनंती करून देखील महावितरणचे अधिकारी यांच्याकडून सुरू असलेल्या वेळ काढूपणामुळे वीज ग्राहकाला वीज बिलांचा दणका बसू लागला असून आर्थिक त्रासाला सामोरे जाण्याची वेळ आली आहे.

वाघोली तालुका हवेली येथील राजेंद्र अमृतराव सातव यांनी घरगुती वापरासाठी दहा केव्ही थ्री फेज कनेक्शन घेतले आहे. यासाठी सोलर सिस्टिम बसवण्यात आली आहे. सोलर सिस्टिम मधून वापरलेले वीज बिल हे अनेक वेळा वजावटीत रुपात आले आहे. काही वेळा ते 400 ते 500 रुपयांच्या भाड्याच्या रूपाने आले आहे. मात्र गेल्या दोन ते तीन महिन्यांपासून हजारोंच्या पटीत विज बिल येत असल्याने वाघोलीच्या सहाय्यक अभियंता बाबर यांच्याकडे याबाबतीत 20 जानेवारी 2025 रोजी मीटर फास्ट असलेल्या संशयावरून मीटर टेस्टिंग करून घेण्याबाबतची लेखी तक्रार सातव यांनी सहाय्यक अभियंता वाघोली यांच्याकडे केली होती.

यासाठीचे टेस्टिंग अनामत रक्कम देखील त्यांनी भरली आहे. २० जानेवारी रोजी पैसे भरून देखील महावितरण कडून त्यांचा वीज मीटर काढून घेऊन त्याची टेस्टिंग न केल्यामुळे नाहक मनस्तापाला सामोरे जाण्याची वेळ आली आहे. महावितरणच्या शाखा अभियंता. यांनी याबाबतीत त्यांनी प्रत्यक्ष सोलर सिस्टिम व इतर उपकरणांची सद्यस्थितीबाबतचा भेटीत आढावा देखील घेतला आहे. तरी देखील महावितरण कडून वाढीव बिलांचा प्रकार सुरू आहे. सोलर सिस्टीम धारकाला आलेल्या अनुभवामुळे वाघोलीत मीटर फास्ट असल्याची तक्रार करून देखील अधिकारी स्लो असल्याची चर्चा मोठ्या प्रमाणात वाढू लागली आहे. मीटर टेस्टिंग साठी सोमवारी पाठवण्यात येणार आहे. असे शाखा अभियंता बाबर यांनी सांगितले आहे.

मीटर फास्ट बाबत पडताळणी करण्याची विनंती करूनदेखील महावितरणचे अधिकारी यांच्याकडून सुरू असलेल्या वेळ काढूपणामुळे वीज ग्राहकाला वीज बिलांचा दणका बसू लागला असून आर्थिक त्रासाला सामोरे जाण्याची वेळ आली आहे.




> मीटर फास्ट अथवा मीटरची पडताळणी करण्याबाबत शाखा अभियंता बाबर यांना प्रत्यक्ष सोलर सिस्टिम दाखवून माहिती दिली आहे. मीटर टेस्टिंगसाठी नेण्यासाठी महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून जाणीवपूर्वक टाळाटाळ करून बिलांमध्ये वाढ करण्याचा प्रकार सुरू आहे.याबाबतीत कार्यकारी अभियंता माणिक राठोड यांच्याशी देखील संपर्क साधला आहे. महावितरण कडून या प्रकरणाची दखल घ्यावी.
>
> - राजेंद्र सातव पाटील, माजी उपसरपंच, वाघोली